जनसंपर्क कक्ष
लोकमत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
12 MAY 2018

# स्वत: नोकरी देणारे व्हा : लवटे

## मानव्यशास्त्र विभागात आप्पासाहेब पवार यांची जयंती साजरी

लोकमत न्यूज नेटवर्क



शिवाजी विद्यापीठातील मानव्यशास्त्र विभागातील सभागृहात डॉ. आप्पासाहेब पवार यांच्या ११२ व्या जयंतीनिमित्त कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्या हस्ते आदर्श विद्यार्थी पुरस्कार स्वीकारताना सागर देशमुख. याप्रसंगी सुनीलकुमार लवटे, एस. जे. नाईक, टी. के. सलगर आदी उपस्थित होते.

कोल्हापूर : डॉ. आप्पासाहेब पवार यांनी सुरु केलेली 'कमवा व शिका योजना' ही स्वावलंबनाची गंगा आहे. या 'कमवा व शिका' योजनेतून शिक्षण घेतलेल्या तरुणाने परावलंबी नोकरीच्या मागे न लागता स्वत: नोकरी देणारे व्हा, असे आवाहन ज्येष्ठ साहित्यिक डॉ. सुनीलकुमार लवटे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील मानव्यशास्त्र विभागात 'डॉ. आप्पासाहेब पवार कमवा व शिका प्रबोधिनी'तर्फे डॉ. आप्पासाहेब पवार यांच्या ११२ व्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर होते.

नांदवडेकर म्हणाले, पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी ध्येय निश्चित करून वाटचाल केली पाहिजे. या ध्येय निश्चितीसाठी 'श्रम आणि योगदान' याची पायाभरणी डॉ. आप्पासाहेब पवार यांनी 'कमवा व शिका' योजनेच्या माध्यमातून केली.

डॉ. आप्पासाहेब पवार विद्यार्थी भवन मध्ये राहून शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते करतील. याप्रसंगी आदर्श विद्यार्थी : सागर देशमुख व महेश बनसडे, आदर्श विद्यार्थिनी - लीना कारखानीस, श्रमजीवी पुरस्कार : बाहुबली पाटील यांना देण्यात आला.

याप्रसंगी कार्यक्रमाचे स्वागत उपाध्यक्ष डॉ. बी. एल. पाटील यांनी केले. पाहुण्यांचा परिचय प्रा. टी. के. सरगर यांनी करून दिला. आभार प्राचार्य डॉ. एस. जे. नाईक यांनी मानले. कार्यक्रमासाठी माजी कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य अंकुश मोरे, भूगोल विभागप्रमुख डॉ. सी. टी. पवार, प्राचार्य डॉ. जी. पी. माळी, प्राचार्य डॉ. मानसिंग जगताप, प्राचार्य डॉ. अशोकराव जगताप, अनुराधा गुरव, किसनराव कुराडे, उद्योगपती एम. बी. शेख, अशोकराव साबळे, शोभा नाईक, अनिल वेल्हाळ, प्राचार्य घेवारी, प्रा. व्ही. डी. देवळे यांच्यासह विद्यार्थी व विद्यार्थिनी उपस्थित होते.

12 MAY 2018 पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# तरुणांनी स्वतः नोकरी देणारे बनावे

## डॉ. सुनीलकुमार लवटे

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

डॉ. आप्पासाहेब पवार यांनी सुरू केलेली 'कमवा व शिका योजना' ही स्वावलंबनाची गंगा आहे. या कमवा व शिका योजनेतून शिक्षण घेतलेल्या तरुणाने परावलंबी नोकरीच्या मागे न लागता स्वतः नोकरी देणारा व्हावा, असे प्रतिपादन साहित्यिक डॉ. सुनीलकुमार लवटे यांनी केले.

डॉ. आप्पासाहेब पवार यांची ११२ वी जयंती कमवा व शिका प्रबोधिनीच्या वतीने साजरी करण्यात आली. त्यांनी डॉ. आप्पासाहेब पवार यांच्यावर झालेल्या विविध संस्कारक्षम प्रसंगाची वेचक मांडणी केली.

अध्यक्षस्थानावरून बोलताना कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर यांनी पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी ध्येये निश्चित करून वाटचाल केली पाहिजे. या ध्येय निश्चितीसाठी 'श्रम आणि योगदान' याची पायाभरणी डॉ. आप्पासाहेब पवार यांनी कमवा व शिका योजनेच्या माध्यमातून केली आहे. ही योजना गेली ५० वर्षे प्रभावी रितीने विद्यापीठ राबवित आहे. याचा शिवाजी विद्यापीठाला सार्थ अभिमान आहे.

डॉ. आप्पासाहेब पवार विद्यार्थी भवनामध्ये राहून शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचा डॉ. सुनीलकुमार लवटे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. आदर्श विद्यार्थी : सागर देशमुख व महेश बनसोडे, आदर्श विद्यार्थिनी - लीना कारखानीस, श्रमजिवी पुरस्कार बाहुबली पाटील यांना देण्यात आला. भाग - १ मध्ये प्रथम क्रमांक मिळविलेल्या भाषा विभाग - कोमल अस्वले, सामाजिक शास्त्र विभाग - राहुल ढेबे, विज्ञान विभाग - लक्ष्मीकांत गंगनाळे, वाणिज्य विभाग - अक्षय कोरे यांचा तसेच भाग - २ मधील भाषा विभाग - पूजा जाधव, सामाजिक शास्त्रे विभाग - सुदर्शन उपलंचवार, विज्ञान विभाग - पल्लवी मेहता, वाणिज्य विभाग, सुप्रिया खिलारे यांचा रोख रु. एक हजार देऊन सत्कार करण्यात आला.

स्वागत उपाध्यक्ष डॉ. बी. एल. पाटील यांनी केले. पाहुण्यांचा परिचय प्रा. टी. के. सरगर यांनी करून दिला. प्राचार्य डॉ. एस. जे. नाईक यांनी आभार मानले. माजी कामगार आयुक्त, अंकुश मोरे, भूगोल विभागप्रमुख डॉ. सी. टी. पवार, प्राचार्य डॉ. जी. पी. माळी, प्राचार्य डॉ. मानसिंग जगताप, प्राचार्य डॉ. अशोकराव जगताप, अनुराधा गुरव, किसनराव कुराडे, उद्योगपती एम. बी. शेख, अशोकराव साबळे, प्रा. एस. टी. सरगर, शोभा नाईक, अनिल वेल्हाळ, प्राचार्य घेवारी, प्रा. व्ही. डी. देवळे आदी उपस्थित होते.

1 2 MAY 2018 Times of India जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

600 EXAMS HELD SINCE MARCH | SPL CAMPS TO HAVE 12,000 MEMBERS

# Varsity starts declaring results of summer exams

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** Shivaji University, Kolhapur (SUK) has started announcing the results of the recently held summer examinations that started from March 22.

According to the university officials, around the results of 21 exams have been announced till Saturday. "As many as 21 central assessment programme (CAP) centres are functioning in Sangli, Satara and Kolhapur districts, while 13 are functioning on the varsity campus alone," an exam department official said.

The official told **TOI** that more than 600 examinations were conducted this summer. The remaining results are likely to be declared in a phased manner in the coming days.

There are a few exams such as engineering and law that are still going on and will take time to finish. All the exams are likely to get over by June 10.

Mahesh Kakade, director of board of examinations and evaluation, said the results announced include under-graduate as well as post-graduate courses and the assessment is going on at the CAP centres.

The work for announcing results is still on and is likely to be completed by the month of June.

**There are few exams such as engineering and law that are going on. All the exams are likely to get over by June 10**

The exam department has decided to draw the first and last year engineering courses results at the earliest, he added.

Explaining the assessment process, Kakade said, "We have continued with last year's assessment pattern through de-centralization of CAP. Each district has its CAP centre in Kolhapur, Sangli and Satara according to the stream which saved a lot of time as well as energy of the evaluators."

Another official from the exam department said issues related to the low number of evaluators generally delays few results.

It should be noted that the SUK had asked the colleges in the division to report the names of the teaching faculties, who despite frequent notices skip the assessment duties.

The chancellor's office has also made it mandatory to announce results within the 30 days of the last paper of the particular exam for which all the available manpower must be utilised.

# Over 24,000 NSS seats allotted to SUK for 2018-19

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** The Shivaji University, Kolhapur (SUK) has been allotted 24,600 National Service Scheme (NSS) volunteering seats for the academic year 2018-19.

This was informed by the higher and technical education department via a May 8 government resolution (GR). The GR stated that for regular programme the SUK has been allotted with 24,600 volunteers, while for the special camps or programs the number will remain at 12,300.

The department has asked the SUK officials to ensure the number of volunteers does not exceed the allotted figure. According to the GR, Savitribai Phule Pune University (SPPU) has been allotted with the maximum 47,600 volunteers among all state varsities, followed by Mumbai University with 42,000.

The varsities have been asked to convey the number of enrolments done under the scheme later this year by September 30.

It should be noted that the state government had issued guidelines for the universities last year that the NSS will have to observe initiatives such as plastic eradication, cleanliness and sanitation drive, creating documentaries of the cleanliness drive in the said area, among others.



**NSS will have to observe initiatives such as plastic eradication, cleanliness and sanitation drive, creating documentaries of the cleanliness drive in the said area**

The guidelines for rural areas said that the NSS will have to look after sacred groves (known as *Devrai*), beautification of the local forts, cleanliness of water storages, awareness about cadaver donation and blood donation activities.

It also added that the NSS will also have to look after awareness campaigns of female foeticide other than organising various initiatives for *Beti Bachao Beti Padhao*. Awareness about the digital literacy is another issue that will have to be looked after.

The NSS was launched in the year 1969 in 37 universities involving 40,000 students with primary focus on the development of personality of students through community service.

जनसंपर्क कक्ष
12 MAY 2018
महाराष्ट्र टाईम्स
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

मटा अँकर

## गुगल अर्थद्वारे जमीन वापरावर नजर, जिल्हा प्रशासनाची नवी यंत्रणा

# सरकारी जमिनीवर राहणार वॉच

gurubal.mali
@timesgroup.com
Tweet : gurubalmaliMT

**कोल्हापूर :** कोल्हापूर जिल्ह्यातील सर्व जमिनीसह स्थावर मालमत्तेवर सरकारी वॉच राहणार आहे. विशेष म्हणजे प्रत्यक्ष जागेवर न जाता लाइव्ह वॉच ठेवता येणार आहे. यामुळे सरकारी जमिनीवर अतिक्रमण झाल्यास त्याची माहिती त्याक्षणी जिल्हा प्रशासनाला समजणार आहे. प्रायोगिक तत्त्वावर भुदरगड तालुक्यात हा प्रयोग यशस्वी झाला आहे. तो लवकरच संपूर्ण जिल्ह्यात कार्यान्वित करण्यात येणार आहे. शिवाजी विद्यापीठ आणि जिल्हा प्रशासनाने संयुक्तपणे ही यंत्रणा तयार केली असून आपत्ती व्यवस्थापनासाठीही याचा उपयोग होणार आहे.




### आपत्ती व्यवस्थापनास मदत

या यंत्रणेचा उपयोग आपत्ती व्यवस्थापनासाठीही होणार आहे. महापूर, जमीन खचली किंवा अन्य कोणतीही नैसर्गिक दुर्घटना घडली तर ती ते नेमक्या कोणत्या ठिकाणी घडली, याची माहिती कळणार आहे. शिवाय पीक परिस्थितीही दिसणार आहे. यामुळे या यंत्रणेचा उपयोग महसूल बरोबरच इतर विभागांनाही होणार आहे.

**महसूल प्रशासनाच्यावतीने सध्या सातबारा ऑनलाइनसाठी डिजिटायझेशनचे काम जोरात सुरू आहे. याचाच पुढील भाग म्हणून शिवाजी विद्यापीठाच्या मदतीने नवीन अॅप तयार केला आहे. यामुळे प्रत्यक्ष जागेवर न जाता कार्यालयात बसून जागेच्या वापराची माहिती समजणार आहे.**

**संजय शिंदे,** निवासी उपजिल्हाधिकारी

**नव्या यंत्रणेमुळे एका क्लिकवर जमिनीचा गटनंबर, मालक, जमिनीचा वापर अशी सर्व माहिती मिळणार आहे. सध्या भुदरगड तालुक्यातील ११४ गावांची माहिती संकलित करण्यात आली आहे. लवकरच संपूर्ण जिल्ह्याची माहिती या पद्धतीने ऑनलाइन उपलब्ध करून देण्यात येणार आहे.**

**प्रा. डॉ. एस. एस. पन्हाळकर,**
भूगोल विभागप्रमुख, शिवाजी विद्यापीठ

जिल्हा प्रशासनाकडे प्रत्येक गावातील जमिनीच्या माहितीबाबतचे गाव नकाशे तयार आहेत. पण, हे नकाशे जुने आहेत. त्यामध्ये बरेच बदल झाले आहेत. शिवाय अलिकडे वाढत्या लोकसंख्येमुळे जमिनीचा वापरही वाढला आहे. यामध्ये गावागावांतील सरकारी जमिनीवर अतिक्रमण वाढत आहे. शिवाय नदीकाठ, जंगल किंवा डोंगरावरही हे अतिक्रमण वाढत आहे. जिल्हा प्रशासनाकडून अतिक्रमण रोखण्याचा प्रयत्न होत असला तरी त्याला मर्यादा येतात. गावपातळीवरील राजकारणामुळे काही ठिकाणी दुर्लक्ष होते, तर काही ठिकाणी मॅनेज होत असल्याने अनेकदा जमीन बळकावण्याचे प्रकार घडत आहेत. यातून सरकारी जमिनीचे प्रमाण कमी होत आहे. असे प्रकार रोखण्यासाठी जिल्ह्यातील इंच न् इंच जमिनीवर लाइव्ह वॉच ठेवण्याची यंत्रणा तयार केली आहे. या यंत्रणेमुळे प्रत्यक्ष जागेवर न जाताही तेथील सद्यस्थिती कळणार आहे.

या यंत्रणेनुसार गुगल अर्थवर उपलब्ध गाव नकाशे सुपर इम्पोज करण्यात येणार आहेत. त्यामुळे जिल्ह्यातील सर्व जमिनीवर सध्या काय सुरू आहे, हे ऑनलाइन दिसणार आहे. जिल्हा प्रशासन आणि शिवाजी विद्यापीठाच्या भूगोल विभागाने हा संयुक्त प्रकल्प तयार केला आहे. प्रायोगिक तत्त्वावर भुदरगड तालुक्यातील गाव नकाशे सुपरइम्पोज करण्यात आले आहेत. यामुळे सरकारी जमिनीचा गैरवापर झाल्यास त्याची माहिती तातडीने प्रशासनाला कळणार आहे. विभागप्रमुख एस. एस. पन्हाळकर व अभिजित पाटील यांनी यासाठी विशेष प्रयत्न केले. निवासी उपजिल्हाधिकारी संजय शिंदे यांच्या मदतीने हा प्रकल्प आता संपूर्ण जिल्ह्यात राबवण्यात येणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
12 MAY 2018
तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठात १९ रोजी रोजगार मेळावा



- पुणे, औरंगाबाद, साताऱ्यातील उद्योजक राहणार उपस्थित
- ५० हून अधिक कंपन्यांचाही सहभाग

प्रतिनिधी
कोल्हापूर

विद्यापीठ कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता माहिती मार्गदर्शन केंद्र, कोल्हापूर आणि शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथे १९ मे रोजी सकाळी ११.०० वाजता विभागीय रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या रोजगार मेळाव्यासाठी जिल्ह्यातील नामवंत खाजगी आस्थापना बरोबरच सातारा, पुणे, औरंगाबाद या जिल्ह्यातील उद्योजकांनांही निमंत्रित केले आहे.

रोजगार देण्यासाठी ५० हून अधिक कंपन्याचा सहभाग असेल. तसेच या मेळाव्याच्या माध्यमातून अंदाजे २००० हजार जणांना रोजगार उपलब्ध होणार आहे. या रोजगार मेळाव्यास उपस्थित राहणाऱ्या उमेदवारांनी आपल्या शैक्षणिक पात्रतेची प्रमाणपत्रे, एम्प्लॉयमेंटचे ऑनलाईन कार्ड, तसेच पात्र पदांसाठी विभागाच्या डब्ल्यूडब्ल्यूडब्ल्यू डॉट महास्वयंम डॉट इन या अधिकृत या संकेत स्थळावर जाऊन ३ ठिकाणी अर्ज भरणे आवश्यक आहे. इच्छुक उमेदवारांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन सहाय्यक संचालक विजय माळी, समन्वयक प्रा. ए.एम. गुरव (०२३१-२६०९१७३), समन्वयक डॉ. जी. एस. राशीनकर (०२३१-२६०९३९८) यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
12 MAY 2018
महाराष्ट्र टाईम्स



# रोजगार मेळाव्याचे विद्यापीठात आयोजन

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठात शनिवारी (ता.१९) सकाळी ११ वाजता शिवाजी विद्यापीठ आणि विद्यापीठ कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता माहिती मार्गदर्शन केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने विभागीय रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

रोजगार मेळाव्यासाठी जिल्ह्यातील नामवंत खासगी आस्थापनाबरोबरच सातारा, पुणे, औरंगाबाद या जिल्ह्यातील उद्योजकानाही निमंत्रित केले आहे. रोजगार मेळाव्यात ५० हून अधिक कंपन्याचा सहभाग असून अंदाजे दोन हजार रोजगार उपलब्ध होणार आहे. रोजगार मेळाव्यास उपस्थित राहणाऱ्या उमेदवारांनी आपल्या शैक्षणिक पात्रतेची प्रमाणपत्रे, एम्प्लॉयमेंटचे ऑनलाईन कार्ड, तसेच पात्र पदांसाठी विभागाच्या www.mahaswayam.in या संकेतस्थळावर जाऊन तीन ठिकाणी अर्ज भरणे आवश्यक आहे. या संधीचा उमेदवारांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन शिवाजी विद्यापीठातील सहाय्यक संचालक विजय माळी, समन्वयक प्रा. ए.एम. गुरव , समन्वयक डॉ. जी. एस. राशीनकर यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
12 MAY 2018
सकाळ

# विभागीय रोजगार मेळावा

कोल्हापूर, ता. ११ : विद्यापीठ कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता माहिती मार्गदर्शन केंद्र, शिवाजी विद्यापीठातर्फे १९ मे रोजी सकाळी दहा वाजता विभागीय रोजगार मेळावा होणार आहे. मेळाव्यासाठी जिल्ह्यातील नामवंत खासगी आस्थापनांबरोबर सातारा, पुणे, औरंगाबाद जिल्ह्यांतील उद्योजकांना निमंत्रित केले आहे. ५० हून अधिक कंपन्यांचा सहभाग असून अंदाजे दोन हजार रोजगार उपलब्ध होतील. तसेच ३० हून अधिक कौशल्य प्रशिक्षकांकडून १०० हून अधिक कौशल्ये देण्याचा मानस आहे. उमेदवारांनी मेळाव्यास येताना शैक्षणिक पात्रता प्रमाणपत्र, रोजगाराचे ऑनलाईन कार्ड घेऊन यावे. पात्र पदांसाठी www.mahaswayam .in या संकेतस्थळावर तीन ठिकाणी अर्ज करणे आवश्यक आहे. इच्छुक उमेदवारांनी लाभ घ्यावा, असे आवाहन सहायक संचालक विजय माळी, प्रा. ए. एम. गुरव, डॉ. जी. एस. राशीनकर यांनी पत्रकाद्वारे केले आहे.

12 MAY 2018
महाराष्ट्र टाईम्स

# विभागीय रोजगार मेळावा १९ रोजी

कोल्हापूर : प्रतिनिधी

विद्यापीठ कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता माहिती मार्गदर्शन केंद्र, कोल्हापूर व शिवाजी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने विभागीय रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

शिवाजी विद्यापीठ येथे शनिवारी (दि. १९) सकाळी दहा वाजता हा मेळावा संपन्न होणार आहे. मेळाव्यासाठी जिल्ह्यातील नामवंत खासगी आस्थापनासह सातारा, पुणे, औरंगाबाद जिल्ह्यातील उद्योजकांनाही आमंत्रित करण्यात आले आहे.

उमेदवारांनी मेळाव्यास येताना शैक्षणिक पात्रतेची प्रमाणपत्रे, एम्प्लॉयमेंटचे ऑनलाईन कार्ड तसेच पात्र पदांसाठी विभागाच्या वेबपोर्टलवर ऑनलाईन तीन ठिकाणी अप्लाय करणे आवश्यक आहे. या मेळाव्याचा इच्छुक उमेदवारांनी लाभ घ्यावा, असे आवाहन सहायक संचालक प्रा. ए. एम. गुरव, विजय माळी, डॉ. जी. एस. राशीनकर यांनी केले.